| | |
|---|---|
| | **फौजदारी किरकोळ अर्ज क्र.५१८/२०२२** |
| | (विश्वासराव येवले जगताप विरुध्द ग्रामपंचायत येवलेवाडी) |
| | CNR : MHSN050036462022 |

## नि.क्र.१ वरील आदेश

प्रस्तूतचा अर्ज जन्म व मृत्यू अधिनियम १९६९ चे कलम १३(३) अन्वये दाखल केलेला आहे.

२. अर्जदाराने असे कथन केले आहे की, त्यांची आई श्रीमती चंदाबाई ज्ञानू येवले जगताप यांचा मृत्यू दिनांक ०७/०८/१९९८ रोजी त्यांचे राहते घरी मौजे येवलेवाडी, ता. वाळवा, जि. सांगली येथे झाला आहे. परंतू अनावधानाने त्यांच्या मृत्यूची नोंद करणे राहून गेले. मृत्यू प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्ज मंजूर होण्यास विनंती केली आहे.

३. सदर प्रकरणात जाबदार म्हणून ग्रामपंचायत येवलेवाडी, ता. वाळवा, जि. सांगली यांना नोटीस पाठविण्यात आली. परंतू नोटीसची बजावणी होऊन देखील कोणीही उपस्थित नाहीले नाही व तसेच अर्जदाराने दिनांक १८/१०/२०२२ रोजी ***दैनिक तरुण भारत*** या वृत्तपत्रामध्ये जाहीर प्रगटन दिले आहे. परंतू, आजतागायत कोणीही आक्षेप दाखल केलेला नाही. त्यामुळे सदर प्रकरण विनाहरकत राहिले आहे.

४. अर्जदाराने त्यांच्या पुराव्याचे प्रतिज्ञापत्र नि.क्र.११ अन्वये दाखल केले आहे. अर्जदाराने त्यांच्या सरतपासात अर्जाशी सुसंगत बाबी शपथेवर कथन केल्या आहेत. तसेच त्यांनी त्यांच्या कथनांच्या पृष्ठयर्थ संबंधीत कार्यालयाचे मृत्यूची नोंद नसल्याचे प्रमाणपत्र नि.क्र.१० अन्वये दप्तरी दाखल केले आहे. अर्जदाराचा पुरावा व प्रस्तूतचे दस्तऐवज हे आक्षेपाविना राहिले आहेत.

५. अर्जदारांचा तोंडी पुरावा व संपुर्ण दस्तऐवजांचे अवलोकन केले असता व विधिज्ञांचा युक्तीवाद लक्षात घेता, अर्जदारांची आई चंदाबाई ज्ञानू येवले जगताप यांचा मृत्यू दिनांक ०७/०८/१९९८ रोजी त्यांचे राहते घरी मौजे येवलेवाडी, ता. वाळवा, जि. सांगली येथे झाल्याचे दिसून येते. परंतू, त्यांच्या मृत्यूची नोंद संबंधीत कार्यालयात केली नसल्याचे दिसून येते. त्यामुळे जन्म व मृत्यू अधिनियम १९६९ चे कलम १३(३) अन्वये संबंधीत निबंधकांना त्यांच्या मृत्यूची नोंद घेण्यास निर्देशीत करणे विधीसंगत वाटते. करिता खालीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येतोः–

## आदेश

१. अर्ज मंजूर करणेत येतो.

२. संबंधीत निबंधक यांना निर्देशीत करणेत येते की, नियमाप्रमाणे शुल्क भरल्यानंतर, अर्जदार यांची आई चंदाबाई ज्ञानू येवले जगताप यांचा मृत्यू दिनांक ०७/०८/१९९८ रोजी त्यांचे राहते घरी मौजे येवलेवाडी, ता. वाळवा, जि. सांगली येथे झालेची नोंद संबंधीत नोंदवहीत घ्यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by MANGESH N JAISWAL
Date: 2022.11.19 16:50:08 +0530

इस्लामपूर.
दिनांक १९/११/२०२२.

**(मंगेश नं. जयस्वाल)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, इस्लामपूर.
[न्यायालय क्र.३]

**- : <u>C E R T I F I C A T E</u> : -**

I affirm that the contents of this P.D.F. file, order are same word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | Sagar Anil Kate |
| Court Name | :- | Judicial Magistrate First Class (Court No.3), Islampur. |
| Date of decision | :- | 19/11/2022. |
| Date of typing | :- | 19/11/2022. |
| Order signed by PO. on | :- | 19/11/2022. |
| Order uploaded on | :- | 19/11/2022. |